डीएमआय प्रायव्हेट फिनान्स लिमिटेड

## शपथपत्र

1. मी/आम्ही अर्जात नमूद केल्याप्रमाणे अल्पमुदत वैयक्तिक कर्ज (सुविधा) घेण्यासाठी अर्ज करीत आहे. अर्जामध्ये नमूद केलेली माहिती ही संपूर्णपणे खरी आहे अशी मी/आम्ही ग्वाही देतो. तथापि, अर्जामध्ये कर्जासंदर्भात भरलेली संपूर्ण माहीती ही मी/आम्ही समजून घेवूनच भरलेले असून डीएमआय फिनान्स लिमिटेड सदर अर्ज मंजूर प्रक्रिया दरम्यान केव्हाही स्वीकारणे तथा नाकारण्याच सर्व अधिकार राखून ठेवित आहे. तसेच मंजूर प्रक्रियादरम्यान अर्जामध्ये भरलेली माहिती ही खोटी/अपूर्ण/बनावट स्वरूपाची आढळून आल्यास कोणतीही पुर्वसूचना न देता ती नाकारण्याचे सर्व अधिकार डीएमआयकडे असून त्याकरिता डीएमआयचे कर्मचारी/प्रतिनिधी/एजंटस/सर्विस प्रोव्हायडर जबाबदार असणार नाहीत.
2. मला/आम्हाला याची जाणीव आहे की डीएमआय इतर कोणतेही सोर्सेस/एजंटसद्वारे वैयक्तिक माहिती प्राप्त करू शकतात आणि मला/आम्हाला याबाबत कोणतेही आक्षेप नाहीत. डीएमआयने माझ्या/आमच्या बँक खात्यासंदर्भातील तथा आमच्यावर असलेल्या इतर कर्जासंदर्भातील आवश्यक ती माहिती तपासण्याचे तथा पडताळणी पाहण्यासाठी माझी/आमची त्यास संपूर्ण सहमती आहे.
3. मी/आम्ही डीएमआय पॉलिसीअंतर्गत केवायसी दस्तावेजासह सदर सुविधेचा लाभ घेण्यासाठी आधार कार्ड/सविस्तर माहिती यासंदर्भात उपयोगात आणण्याची स्व:खुशीने समंती देत आहोत. मी/आम्ही डीएमआयला संमती देतो की माझे/आमचे आधारकार्ड विवरण, पॅन नं./माझ्या/आमच्या पॅन कार्डची प्रत, इतर ओळखपत्र आणि बँक खाते विवरण वेळोवेळी प्राप्त करणे तथा इतर बँक/वितीय संस्था/सिबिल इत्यादीसोबत सदर दस्तावेज माझे/आमचे कर्जासंदर्भातील पार्श्वभुमी, सिबिल अहवाल, एक्सपेरियन, हंटर आणि यासंदर्भातील इतर अहवाल प्राप्त करण्याच्या उद्देशाने उपयोग करण्याची संपूर्ण सहमती देत आहोत. मी/आम्ही स्पष्टपणे तथा ठामपणे डीएमआयला अधिकार प्रदान करतो की सदर कर्ज मंजरी प्रक्रियेच्या मुल्यांकनादरम्यान त्यांनी कर्जासंदर्भातील उद्देशोकरिता माझे/आमचे केवायसी पडताळणी तथा संकलन, जमा, इतरांना देवू करणे आणि माझी/आमची वैयक्तिक माहिती प्रत्यक्ष तथा अप्रत्यक्षपणे तपासणे आणि यासंदर्भातील योग्य त्या कारणांसाठी उपयोग करण्याचे सर्व अधिकार मी/आम्ही डीएमआयला देत आहोत. अधिक माहितीसाठी https://www.dmifinance.in/privacy-policy.html या वेबसाइटला कृपया भेट द्या.
4. मी/आम्ही याद्वारे स्वेच्छेने सीईआरएसएआय (CERSAI) कडून सीकेवायसी (CKYC) मिळवण्याच्या उद्देशाने आणि डीएमआय (DMI) धोरणांनुसार पॅन (PAN) किंवा आधार कार्ड/तपशील वापरण्यास माझी/आमची संमती देतो. मी/आम्ही याद्वारे माझा/आमचा आधार तपशील, पॅन (PAN) क्रमांक/माझ्या/आमच्या पॅन (PAN) कार्डची प्रत, इतर ओळख पुरावे आणि बँक खात्याचे तपशील वेळोवेळी पॉलिसीच्या अनुषंगाने वापरण्यासाठी डीएमआय (DMI) ला संमती देतो आणि या माहितीच्या वापरासाठी मी / आम्ही डीएमआय (DMI) ला जबाबदार धरणार नाही. मी/आम्ही याद्वारे स्पष्टपणे आणि अपरिवर्तनीयपणे माझ्या/आमच्या वैयक्तिक माहितीचे कोणतेही पैलू सीईआरएसएआय (CERSAI) कडून संकलित, संग्रहित आणि सामायिक करण्यासाठी, प्राप्त करण्यासाठी आणि प्रमाणित करण्यासाठी आणि अशी माहिती स्वतःच्या एजंट्स/कंत्राटदार/सेवा प्रदात्यांकडे ठेवण्यासाठी डीएमआय (DMI) ला अधिकृत करतो आणि अशी माहिती डीएमआय (DMI) किंवा त्यांच्या व्यवसाया द्वारे केवायसी (KYC) प्रमाणीकरण, सुविधा आणि अंतर्गत मूल्यांकनासाठी देखील वापरली जाऊ शकते.
5. मी/आम्ही याद्वारे घोषित करतो आणि पुष्टी करतो की मी/आम्ही या सुविधेचा लाभ घेण्यासाठी या अर्जात दिलेले मोबाईल क्रमांक माझ्या/आमच्या आधारशी जोडलेले आहेत/आहेत.
6. मला/आम्हाला सदर अर्जामध्ये नमूद केलेल्या मोबाइल क्रमांकावर एसएमएस/व्हाटसअप किंवा टेलीफोन कॉलद्वारे तसेच या शपथपत्रातील किंवा इतर कोणतेही संपर्क माध्यमाद्वारे, व्यवहार्य माहिती, डीएमआयद्वारे पुरविण्यात येणाऱ्या कर्जविषयक विविध प्रस्ताव योजना किंवा कर्ज विषयक प्रोत्साहनपर योजना किंवा इतर प्रोत्साहनपर योजनासंदर्भात माहिती प्राप्त करायला आवडेल आणि त्यांचे कर्मचारी, एजंट आणि त्यासंदर्भातील कोणीही व्यक्ती यांना मी/आम्ही हे अधिकार सुपूर्द करीत आहोत. मी पृष्टी करतो की नॅशनल डू नॉट कॉल रजिस्ट्री (दि एनडीएससी रजिस्ट्री) मध्ये नमूद डीएमआय, त्याचे कर्मचारी, एजंट आणि यांच्याकडून अवांछित कॉलसंदर्भातील कायदे भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणाने नमूद केल्याप्रमाणे प्राप्त कॉल/एसएमएस/व्हाटसअप मसेजेस लागू असणार नाहीत.
7. मी/आम्ही हे मान्य करतो की सोर्सिंग पार्टनर आणि डीएमआय हे स्वतंत्र आहेत आणि मी/आम्ही सोर्सिंग पार्टनरद्वारे प्रदान केलेल्या सुविधा तथा डीएमआयद्वारे नामंजूर/वाटप न केलेल्या कर्जावर कोणतेही अधिकार बजाविणार नाहीत. मी मान्य करतो की सोर्सिंग पार्टनरद्वारे प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही प्रकारच्या सेवेकरिता डीएमआय प्रातिनिधिक, ग्वाही, विधान किंवा शेरा देण्यास डीएमआय उत्तरदायी नाही आणि यासंदर्भात काही खाटे किंवा फसवेगिरी झाल्यास जबाबदार असणार नाही.
8. मला/आम्हाला याची जाणीव आहे की मला/आम्हाला सदर अर्जात मागविण्यात आलेली माहिती सादर न करण्याचे संपूर्ण स्वातंत्र्य तथा पर्याय आहेत आहे तसेच आवश्यक ती माहिती डीएमआय वेळोवेळी मागवू शकते परंतु असे पर्याय स्वीकारल्यानंतर जीसी नियमानुसार डीएमआय कर्ज मंजरी किंवा प्री-पीमेंट कोणत्याही स्टेजवर थांबवू शकते.
9. मी/आम्ही घोषित करतो की मी/आम्ही रोख, बेयरर चेक किंवा इतर कोणत्याही स्वरूपात माझा/आमचा अर्ज सादर करतांना पैसे दिलेले नाहीत. सदर अर्ज स्वीकारणाऱ्या व्यक्तीने अशा प्रकारचे पेमेंट करण्यात आल्यास मी/आम्ही डीएमआय/त्यांचे कर्मचारी/प्रतिनिधी/एजंट/सर्विस प्रोव्हायडर्स अशा प्रकारच्या खोट्या किंवा फसव्या कृतीला जबाबदार असणार नाही.
10. मी याद्वारे घोषित करतो की माझे एकूण कौटुंबिक उत्पन्न दरमहा 25,000 पेक्षा जास्त आहे **
11. मी याद्वारे घोषित करतो की मी कोणत्याही राजकीय संघटनेत कोणतेही पद धारण करत नाही किंवा त्याच्याशी अप्रत्यक्षपणे संबंधित नाही
12. **मी/आम्ही खात्री देतो की मला/आम्हाला सदर अर्जासंदर्भातील सर्व अटी आणि शर्ति समजलेल्या आहेत.**

**कुटुंब म्हणजे वैयक्तिक कौटुंबिक घटक, म्हणजे पती, पत्नी आणि त्यांची अविवाहित मुले.